Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 71 – 73
DOI: 10.5281/zenodo.10072496

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना

प्रा. डॉ. प्रभाकर रामलिंग किर्तनकार

स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, आदर्श कॉलनी, पूर्णा (जं) जिल्हा: परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: kirtankarpr@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

**प्रस्तावना**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील बहुतांशी भाग खेड्यांनी व्यापलेला आहे. भारत हा खेड्यांचा देश असल्यामुळे भारताच्या विकासात ग्रामीण विकासाची भूमिका महत्त्वाची आहे. पूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. प्रत्येक व्यक्तीच्या गरजा गावातच पूर्ण होत असत, मात्र कालांतराने औद्योगिक क्रांतीच्या प्रभावामुळे भारतीय खेडी बकास झाली. महात्मा गांधीजींनी भारताच्या सर्वांगीण विकासासाठी ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली.ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला. ग्रामव्यवस्था हे भारतासारख्या कृषी प्रधान देशाचा आत्मा आहे. उद्याचा भारत कसा असेल ? याचे स्वप्न गांधीजींनी पाहिले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासाचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतात. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेमुळे ग्रामीण विकासाला नवी चालना मिळालेली दिसून येते. त्यांच्या ग्राम स्वराज्य या संकल्पनेचे चिकित्सक अध्ययन करणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

महात्मा गांधीजींनी ग्राम स्वराज्याचा पुरस्कार केला. एकीकडे अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्याचा लढा चालू ठेवला आणि दुसऱ्या बाजूने देशाच्या सामाजिक व आर्थिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारण, खादी ग्रामोद्योग, मूलोद्योगी शिक्षण, शेतकरी व कामगार संघटन असे विविध कार्य हाती घेतले. महात्मा गांधीजींनी स्वराज्याला आदर्श समाजाकडे जाण्याची एक पायरी मांडले आहे. स्वराज्य म्हणजे काही मुठभर लोकांनी सत्ता स्थापन करणे नसून मानवाचे सर्वांगीण कल्याण व्हावे यासाठी सर्वसामान्य जनतेद्वारे चालविलेले शासन म्हणजे स्वराज्य होय. महात्मा गांधीजींचे ग्राम स्वराज्य हे कल्याणकारी राज्य होय. जॉन रस्किन यांच्या "अन टू धिस लास्ट" या

पुस्तकाच्या प्रभावातून त्यांचीही आदर्श समाजाची संकल्पना तयार झालेली होती. महात्मा गांधीजींना अपेक्षित असणारे ग्राम हे गणराज्य प्रमाणेच होते. खेड्यातील लोकांना गावाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. गावातील प्रत्येक व्यक्तीस निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे. गावातील तंटे गावातच मिटावीत. जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत खेडे स्वावलंबी असावीत. गावात कच्चामाल भरपूर आहे पण त्याचे पक्क्या मालात रूपांतर करण्याचे उद्योग गावात नसल्यामुळे गावाचे आर्थिक नुकसान होत आहे. खेड्यातील संपूर्ण अर्थकारणच शेती आधारित आहे. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य कल्पनेतील खेडी आत्मनिर्भर होती. खादी व ग्रामोद्योगासारख्या मूलभूत उद्योगांच्या माध्यमातून खेडी स्वावलंबी होऊ शकतील असे त्यांना वाटते. भारतात आजही ग्रामीण विकासात ग्रामोद्योगाचे महत्त्वपूर्ण योगदान राहू शकते. शासन ग्रामोद्योग व लघु उद्योगासाठी विविध प्रकारची कर्जे उपलब्ध करून देत आहे. विविध बचत गट व त्या गटाच्या माध्यमातून उत्पादन केली जाणारी विविध उत्पादने ग्रामीण विकासाला पूरक ठरत आहेत. महात्मा गांधीजींना भांडवलशाहीतील दोष टाळून मुक्त, सर्वोदयी समाज उभा करावयाचा होता. भौतिक विकासापेक्षा मानवतावादी मूल्यांची जोपासना करावयाची होती. भांडवलशाहीत भांडवलदार व कामगार, शोषक व शोषित असे वर्ग तयार होऊन समाजात संघर्ष निर्माण होतो. यामुळेच गांधीजी मोठ्या उद्योगांना विरोध दर्शवितात. त्या ऐवजी किमान कौशल्यावर आधारित हस्त उद्योग, कुटीर उद्योग यांना प्राधान्य देतात. यामुळे ग्रामीण बेरोजगारी व दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

महात्मा गांधीजींनी श्रमास प्रतिष्ठा दिली होती. श्रम हाच ग्रामीण विकासाचा महत्त्वाचा आधार आहे. यंत्राने मानवी श्रमाचे महत्त्व कमी होते यासाठी खादी व ग्रामोद्योगासारख्या हस्त व्यवसायांना प्राधान्य द्यावे. उत्पादन साधने छोटी वापरावीत. प्रचंड मोठी यंत्रे भारतीय अर्थव्यवस्थेला परवडणारी नाहीत. छोट्या प्रमाणात विकेंद्रीकरण व्हावे. महात्मा गांधीजींनी खादीचा प्रचार व प्रसार केला. कच्चा मालाची सुबत्ता असणाऱ्या खेड्यांना चरख्याच्या सहाय्याने खादी उद्योगाला चालना मिळून दिली. ग्रामपातळीवर लघु कुटीर व प्रक्रिया उद्योग सुरू झाले तर गावात रोजगार निर्मिती होईल व गाव स्वावलंबनाकडे वाटचाल करेल.

ग्रामसफाई हा ग्राम जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. गांधीजींच्या मते, व्यक्तिगत स्वच्छतेच्या बाबतीत भारतीय लोक अग्रणीय असतात परंतु सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत असे घडत नाही. आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्यास ग्राम स्वच्छता महत्त्वाची आहे. तसेच सांडपाणी व कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून खत निर्मिती करता येऊ शकते व त्याचा वापर शेतीसाठी होऊ शकतो. शेतीस पूरक जोड व्यवसाय म्हणून गोपालन केले पाहिजे. दुधाचे उत्पादन व शेणखत निर्मिती बरोबरच शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या बैलांची पैदास होऊन आर्थिक फायदा होईल.

ग्रामस्वराज्यामध्ये पुरुषांनी इतकाच महत्त्वाचा घटक स्त्री सुद्धा आहे. प्राचीन काळामध्ये भारतीय समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते परंतु मध्ययुगीन काळात स्त्रियांवर काही मर्यादा पडलेल्या आपल्याला दिसून येतात.महात्मा गांधीजींच्या मनामध्ये स्त्रियांबद्दल अपार सहानुभूती होती. स्त्री पुरुष दोघांच्या भूमिका एकमेकाला पूरक आहेत. स्त्रियांना समान संधी दिली पाहिजे तसेच व्यावहारिक शिक्षण दिले पाहिजे. स्त्रियांना चूल आणि मूल एवढेच न समजता

पुरुषांकडून चांगली वागणूक आणि समाजात मानाचे स्थान मिळाले पाहिजे असा विचार मांडून महिला सबलीकरणाचा पाया रोवला.

समाजातील मुठभर व्यक्तींच्या हाती सत्ता असणे यास गांधीजींचा विरोध होता. स्वराज्य म्हणजे सर्वसामान्यांचे शासन अशी संकल्पना होती. स्वराज्याची सुरुवात खालच्या स्तरापासून झाली पाहिजे. असे त्यांना वाटत होते म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला' असा नारा दिला होता. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण जनतेला सत्तेत सहभागी करून घेऊन पंचायत राजच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले व ग्रामीण लोकांना स्वतःची प्रगती स्वतःच करून घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

थोडक्यात आजही महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य तत्त्वज्ञानाची ग्रामीण जनतेला खरी गरज आहे. ग्रामीण क्षेत्राबाबतचे नियोजन ग्रामीण जनतेला विश्वासात घेऊन तयार करावेत. त्यांच्या प्राथमिक गरजा, शेती उत्पादनाची खरेदी व निर्यात, शेती उत्पादनांना रास्त भाव, ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी विशेष तरतूद व्हावी, शेती उद्योगाला चालना मिळाली तरच महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज संकल्पना व्यवहारिक दृष्ट्या फलदायी ठरेल आणि ग्रामस्वराज्य अधिक सुलभतेने अस्तित्वात येईल

**संदर्भ सूची**

१. लोकराज्य - माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मार्च 2010 व एप्रिल 2013
२. बाळासाहेब भारदे -ग्रामीण क्रांतीची दिशा, महात्मा गांधी स्मारक निधी पुणे, -2003
३. महात्मा गांधी - हिंद स्वराज, परंधाम प्रकाशन, पवनार -1998
४. पी. डी. देवरे- भारतीय राजकीय विचार, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव